आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० जुलै २०२४ -मंगळवार

देश आठ टक्के वेगाने प्रगती करीत असून अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रावर यंदाच्या अर्थसंकल्पात लक्ष दिलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडीयन इंडस्ट्रीज या उद्योजक संघटनेनं आज नवी दिल्लीत आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या चर्चासत्राचा विषय आहे, विकसित भारताच्या दिशेने वाटचाल.  केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह अनेक मान्यवर या परिषदेला उपस्थित होते.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सायंकाळी लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देणार आहेत.

**<><><><><>**

कृषि पायाभूत सुविधा निधी अंतर्गत देशभरात ७६ हजार कोटी रुपयांचे ७२ हजार पायाभूत सुविधा प्रकल्प उभारण्यात आल्याचं केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. लोकसभेत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी शून्य काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेत, त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देण्याची मागणी केली.

**<><><><><>**

राज्याचे मावळते राज्यपाल रमेश बैस यांना आज निरोप देण्यात आला. राजभवनात झालेल्या या निरोप सभारंभाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, तसंच राजभवनातले अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या आदिवासी विकास कार्यकारी सहकारी संस्थांच्या विविध मागण्यांसंदर्भात आज मंत्रालयात बैठक झाली. आदिवासी शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या विविध योजनांचे लाभ मिळत नाहीत. त्यांना या योजनांचे लाभ मिळावेत म्हणून आदिवासी विभाग तसंच सहकार विभागानं सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी अधिकाऱ्यांना केली. आदिवासी शेतकऱ्यांसाठीच्या संस्थांना त्यांच्या गुणवत्तेनुसार वाढीव अनुदान द्यावं तसंच शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळाकडच्या थकीत कर्जाबाबत तोडगा काढावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

**<><><><><>**

धारावीतल्या रहिवाशांना धारावीतच घर मिळायला हवं अशी आमची मागणी असून धारावीवासियांना बेघर होऊ देणार नाही, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. पशुसंवर्धन खात्याचा भूखंड मुंबै बँकेला दिला असून महाविकास आघाडीचं सरकार आलं तर हा निर्णय रद्द करु, असं ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केरळच्या वायनाड जिल्ह्यातल्या मुंडक्काई, अट्टामाला आणि चूरमाला या भागात मुसळधार पावसामुळे आज दरड कोसळून ३६ जणांचा मृत्यू झाला तर ६६ जण जखमी झाले. वाहून गेलेले १० मृतदेह नदीत सापडले. बचावकार्य सुरु आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, तसंच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत

निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

**रायगड** जिल्ह्यात गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे ५०० घरांची पडझड झाली आहे. मुसळधार पावसामुळे सावित्री, अंबा, कुंडलिका आदी नद्यांना पूर आल्याने आतापर्यंत ३ हजार ३८९ जणांना स्थलांतरित केलं असून शासनाकडून त्यांना सर्व प्रकारची मदत करण्यात येत आहे.

**कोल्हापुरात** पुराचं पाणी ओसरण्यास सुरुवात झाली असून, जनजीवन पुन्हा पूर्ववत होत आहे.

**सांगली** जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला, मात्र पूरस्थिती अद्याप कायम आहे. **गडचिरोली** जिल्ह्यातही पावसाने विश्रांती घेतली आहे. मात्र, विविध धरणांतून मोठा विसर्ग करण्यात येत असल्याने, जिल्ह्यातल्या १३ मार्गांवरील वाहतूक ठप्प आहे.

**<><><><><>**

हावडा - मुंबई एक्सप्रेसला झारखंडमधे अपघात होऊन दोन प्रवाशांचा मृत्यू झाला तर अनेक प्रवासी जखमी झाले. झारखंडमधल्या बडाबांबू आणि खारसावा या रेल्वेस्थानकांच्या दरम्यान काल मध्यरात्री रेल्वेचे अठरा डबे रुळावरून घसरून शेजारच्या रुळावरून जाणाऱ्या मालगाडीला धडकले, त्यामुळे दोन्ही गाड्यांचे डबे दूर फेकले गेले. तसंच रेल्वे रुळ उखडले गेले. अपघातस्थळी बचावकार्य सुरू आहे. रेल्वेनं अनेक मदत क्रमांक जाहीर केले आहेत. मुंबईसाठी ०२२-२२-६९-४०-४० या क्रमांकावर संपर्क करण्याचं आवाहन केलं रेल्वेनं आहे.

**<><><><><>**

भारतीय नेमबाज मनु भाकर आणि सरबजोत सिंग या जोडीनं पॅरिस ऑलिंपिकमधे १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात मिश्र दुहेरी गटात कांस्य पदक पटकावलं आहे. या बरोबरच स्वातंत्र्योत्तर काळात एकाच क्रीडा प्रकारात एकाच ऑलिंपिकमधे दोन पदकं मिळवणारी मनु भाकर ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

//<><><><><>//